**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : अंकुश ज्ञानेश्वर पोखरकर,
वय : ५४ वर्षे,
व्यवसाय : ड्रायव्हर,
राहणार : वडगाव पीर, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके.</u>**

१. पारगाव पोलीसांनी मला किती तारखेला व कशासाठी बोलविले होते हे सांगता येणार नाही. मी पोलीस स्टेशनला स्वतःहुन गेलो होतो. तेव्हा पोलीसांनी मला सही करण्यास सांगितले. पोलीसांनी सही करण्यास सांगितल्याने मी सही केली.

२. आता मला दि.०९/०९/२०२३ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. परंतु त्यामध्ये काय लिहिले हे मला माहिती नाही. सदर सही पुरता **निशाणी क्र.१३** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन देत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी वकीलांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली )**

३. हे म्हणणे खरे नाही की, पारगाव पोलीसांनी मला घटनास्थळा व जप्ती पंचनामा करण्यासाठी लोणी गावच्या हद्दीत सोनवणे चायनीजच्या मागे बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी तिथे गेलो, माझ्या समोर जप्ती पंचनामा झाला म्हणुन मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यावेळी तेथे हजर होतो. पंचनाम्यातील मजकुर मी वाचला. मला तो खरा व बरोबर वाटला म्हणुन मी त्यावर सही केली. पोलीसांनी मला सही करण्यास सांगितली त्यामुळे मी पंचनाम्यावर न वाचता सही केली.

४. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी परेश प्रकाश शहा यास ओळखतो म्हणुन त्यांना वाचविण्यासाठी त्यांच्याविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास : आरोपी पक्षातर्फे वकील श्री. एन. आर. निघोट यांच्यामार्फत**

५. नाकारला.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. २८/१०/२०२५**
**घोडेगाव**